# मुंबई विद्यापीठ

**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकीसाठी प्राचार्य/संचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख या मतदार संघाच्या अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करणेबाबत.**

## जाहीर प्रकटन

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/३९.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे १० प्राचार्य/संचालक, कलम २८(२)(त)[28(2)(p)] अन्वये संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्थेच्या ०६ व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थेतील १० अध्यापक, कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर व कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] नुसार ८ अध्यापक (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे ०२ अध्यापक) विद्यापरिषदेवर आणि कलम ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयातील/परिसंस्थातील ०३ विभाग प्रमुख अभ्यासमंडळावर निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्या क्र. ८ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या प्राचार्य/संचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख यांच्या अंतिम मतदार याद्या **शनिवार, दिनांक २० मे, २०२३** रोजी विद्यापीठाच्या **https://mu.ac.in** या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा **https://mu.eduapp.co.in** या संकेतस्थळावर Voter List या सदराखाली cilk here for final voter list या (Tab) वर प्रसिध्द केल्या आहेत. सदर संकेतस्थळावरून अंतिम मतदार याद्या विनामुल्य डाऊनलोड करता येतील. मतदार यादी प्रसिध्द झाल्याबद्दलची माहिती संक्षिप्त संदेश (SMS) द्वारे संबंधितांना कळविण्यात आलेली आहे.

निवडणूकीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : १९ मे, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.